☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्र. - 02462-235103

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जा.क्रं./ प्रेस नोट/271/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 /

दिनांक : 07/07/2025

# नांदेड जिल्हा पोलीस व हिंदुस्तान पेट्रोलियम यांच्या संयुक्त विद्यमाने "मिशन निर्भया" अंतर्गत निर्भया मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात संपन्न..

नांदेड पोलीस दलाकडून "मिशन निर्भया" हा उपक्रम राबविण्यात येत असून या उपक्रमा अंतर्गत सायबर गुन्हे, वाहतूक नियम, विविध हेल्पलाईन्स, अंमली पदार्थ, कम्युनिटी पोलीसींग, महिला सुरक्षा व इतर विषयासंदर्भात नागरीकांमध्ये जनजागृती करण्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

या उपक्रमाचा भाग म्हणून नांदेड जिल्हा पोलीस दलाचे पेट्रोल पंपाला चार वर्षे पूर्ण होत असल्याने चौथ्या वर्धापन दिनानिमित्त तरूणांमध्ये उत्तम आरोग्या बाबत जनजागृती करणे व त्यांनी व्यसनापासुन दुर राहावे या दृष्टीकोनातुन नांदेड जिल्हा पोलीस दल व हिंदुस्तान पेट्रोलियम यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड जिल्हा पोलीस दलाकडून निर्भया मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते.

सदर निर्भया मॅरेथॉन स्पर्धा दिनांक 07.07.2025 रोजी सकाळी 06.00 वाजता स्नेहनगर पोलीस कॉलनी, पेट्रोल पंप नांदेड या ठिकाणा वरून आयोजित करण्यात आली. सदर निर्भया मॅरेथॉन स्पर्धेची स्नेहनगर पोलीस कॉलनी, पेट्रोल पंप नांदेड येथून सुरूवात होवून महात्मा फुले पुतळा आय.टी.आय.चौक–व्हि.आय.पी.रोड–अण्णाभाऊ साठे चौक–श्री वसंतराव नाईक चौक–आनंद नगर–वर्कशॉप या मार्गाने जावून स्नेहनगर पोलीस कॉलनी पेट्रोल येथे पुर्ण झाली. सदर स्पर्धे मध्ये महाविदयालयीन, शालेय विदयार्थी, शहरातील व्यापारी, वॉकर, रनर्स ग्रुप व नागरीकांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला स्पर्धेत एकुण 600 स्पर्धकांनी भाग घेतला होता. सदरची स्पर्धा ही दोन किमी व पाच किमी महीला व पुरूष अशी होती.

निर्भया मॅरेथॉन स्पर्धेमध्ये भाग घेणारे स्पर्धकांपैकी दोन किमी स्पर्धेत महीला गटात 01)शिवानी बोकारे यांनी प्रथम कमांक 2)पुनम चव्हाण यांनी व्दितीय कमांक 3)वैष्णवी कोथळे यांनी तृतीय कमांक पटकाविला. तसेच पुरूष गटात 01)गणेश घोगडे यांनी प्रथम कमांक 2)मानिक पपलवाड यांनी व्दितीय कमांक 3)दत्ता मोरे यांनी तृतीय कमांक पटकाविला. दोन किमी स्पर्धेत विजयी स्पर्धकांना प्रथम,व्दितीय व तृतीय यांना अनुक्रमे 01)रोख 3000/–रू. व ट्रॉफी 02)रोख 2000/–रू व ट्रॉफी 3)रोख 1000 व ट्रॉफी असे बक्षीस मान्यवरांचे हस्ते देण्यात आले.

निर्भया मॅरेथॉन स्पर्धेमध्ये भाग घेणारे स्पर्धकांपैकी पाच किमी स्पर्धेत महीला गटात 01)प्रमीला बाबर यांनी प्रथम कमांक 2)अस्मिता ससाने यांनी व्दितीय कमांक 3)रूपाली घोडके यांनी तृतीय कमांक पटकाविला. तसेच पुरूष गटात 01)ऋषीकेश वावडे यांनी प्रथम कमांक 2)सुरेश भालेराव यांनी व्दितीय कमांक 3)माधव शेवटे यांनी तृतीय कमांक पटकाविला. पाच किमी स्पर्धेत विजयी स्पर्धकांना प्रथम,व्दितीय व तृतीय यांना अनुक्रमे 01)रोख 10,000/–रू. व ट्रॉफी 02)रोख 5000/–रू व ट्रॉफी 3)रोख 3000 व ट्रॉफी असे बक्षीस मान्यवरांचे हस्ते देण्यात आले.

स्पर्धेमध्ये प्रथम नोंदणी करणारे 500 स्पर्धकांना टि शर्टचे वाटप करण्यात आले. स्पर्धेमध्ये सहभागी होणारे स्पर्धकांसाठी फळे व अल्पोपहारचे आयोजन करण्यात आले .

सदर **निर्भया मॅरेथॉन** स्पर्धा कार्यक्रमासाठी मा. श्री सुनिलजी वेदपाठक, प्रमुख जिल्हा न्यायाधिश, मा.श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक,नांदेड, मा.श्री महेशकुमार डोईफोडे, मनपा आयुक्त, मा.श्रीमती मेघना कावली, मुख्य कार्यकारी अधिकारी,मा. श्री जयकुमार टेंबरे, जिल्हा क्रिडा अधिकारी नांदेड, मा.श्री सुरज गुरव,अपर पोलीस अधीक्षक,नांदेड, मा.श्रीमती अश्विनी जगताप,उप वि पो अ कंधार तथा पोलीस उप अधिक्षक गृह व इतर पोलीस अधिकारी तसेच हिंदुस्तान पेट्रोलीयमचे श्री अमीत कलगुंडकर, रिजनल मॅनेजर ऑफीसर, श्री तन्मय कोमटी, सेल्स ऑफीसर,नांदेड असे मान्यवर उपस्थित होते.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड